# अदाणी ट्रान्समिशन (इंडिया) लिमिटेड

## सुधारीत याचिकेचा हेतू:-

**वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि वित्तिय वर्ष २०१८-१९ च्या ट्रुइंग-अप साठी मल्टि-इयर टॅरिफ याचिका; वित्तिय वर्ष २०१९-२०चे तरतूद करण्यात येणारा ट्रु-अप आणि वित्तिय वर्ष २०२०-२१ ते वित्तिय वर्ष २०२४-२५ साठी वार्षिक महसूली आवश्यकचे प्रक्षेपण.**

**सादर केल्याचे स्थान:-**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

# कार्यकारी सारांश

# १. कार्यकारी सारांश

## १.१ प्रस्तावना

१. सन्माननीय आयोगाने केस क्र. ४४ सन २०१२ मधील दिनांकित १०-०१-२०१३ एमवायटी आदेशाअन्वये वित्तिय वर्ष २०१२-१३ पासून वित्तिय वर्ष २०१५-१६ पर्यंत नियंत्रण कालावधीसाठी एआरआर मंजूर केलेला आहे.

२. एटीआयएल (पूर्वी एपीएमएल-टी असे नाव असणाऱ्या) यांनी ०९-१२-२०१३ रोजी मध्यावधी कामगिरीचा पुनरावलोकन करणारी याचिका दाखल केली होती. सन्माननीय आयोगाने वित्तिय वर्ष २०१२-१३ च्या एआरआरची ट्रु-अप, वित्तिय वर्ष २०१३-१४ च्या एआरआरची तात्पुरती ट्रु-अप आणि वित्तिय वर्ष २०१४-१५ आणि वित्तिय वर्ष २०१५-१६ च्या एआरआरचे सुधारीत प्रक्षेपण यांना मंजुरी देत मध्यावधी कामगिरी पुनरावलोकन या विषयावर सन २०१३ च्या केस क्र. १९० मध्ये ०३-०७-२०१४ रोजी एक आदेश दिलेला आहे.

३. सन्माननीय आयोगाने केस क्र. १३६ सन २०१४ संबंधित ०९-०७-२०१५ या तारखेच्या आदेशानुसार याचिकाकर्त्यांच्या पारेषण परवान्यातील दुरुस्तीला मंजुरी दिलेली आहे आणि परवाना देण्यात आलेल्या पारेषण मालमत्तेचा भाग म्हणून तिरोडा सबस्टेशन येथील बस रिॲक्टर्स आणि संलग्न बेज यांचा समावेश केलेला आहे.

४. सन्माननीय आयोगाने सन २०१६ च्या केस क्र. ०७ मध्ये २८-०६-२०१६ या तारखेचा आदेश जारी केला आहे. सन्माननीय आयोगाने आपल्या आदेशाद्वारे पुढील गोष्टींना मान्यता दिलेली आहे

ए) वर्ष २०१२-१३, २०१३-१४ आणि २०१४-१५ च्या एआरआरचे ट्रु-अप

बी) वर्ष २०१५-१६ चे तात्पुरते (प्रोव्हिजनल) ट्रु-अप आणि

सी) तिसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी म्हणजेच २०१६-१७ पासून २०१९-२० पर्यंतच्या काळासाठी एआरआरला मंजुरी

५. सन्माननीय आयोगाने असे करीत असतानाच त्या, अनुषंगाने पुढील गोष्टी ठरविल्या आहेत

ए) संबंधित कार्यान्वयन व देखभालीच्या खर्चासह बस रिॲक्टर्सच्या भांडवली खर्चाला परवानगी न देणे

बी) सर्वसाधारण कामकाज व देखभाल पेक्षा अतिरिक्त असणाऱ्या, दावा करण्यात आलेल्या प्रत्यक्ष कामकाज व देखभाल खर्चाला हा अतिरिक्त खर्च याचिकाकर्त्याने दावा केलेला नियंत्रणाबाहेरील खर्च असूनही तुलनेत नियंत्रण करता येण्यासारखा असल्याचे ठरवून त्या खर्चाला परवानगी नाकारणे

सी) जमा झालेले परंतु न मिळालेले विलंबित भरणा शुल्क (डिपीसी) हे बिगर टॅरिफ उत्पन्न समजणे आणि त्याद्वारे वर्ष २०१५-१६ साठी तात्पुरते मंजूर झालेले एआरआर कमी करणे.

डी) डीमर्जर किंवा विभाजनाच्या एकंदरीत खर्चाला परवानगी देणे

६. याचिकाकर्त्यांन (ए) ते (डी) मधील वर्णन केलेल्या (रकमांवर) दाद मागून (अपीलद्वारे) सन्माननीय एपीटीईएल यांच्याकडे कलम १११ अंतर्गत आव्हान दिले आहे. सदर अपील हे अपील क्र. २५० सन २०१६ म्हणून नोंदविण्यात आले होते.

७. सन्माननीय एपीटीईएल यांनी आपल्या आदेश दिनांकीत २९-०५-२०१९ द्वारे अपील क्र. २५० सन २०१६ ला अशंतः मंजुरी दिली आहे. सन्माननीय एपीटीईएल यांनी वहनखर्चासह तयार होणाऱ्या नवीन टॅरिफला, बस रिॲक्टर्सचा भांडवली खर्च विचारात घेण्याच्या याचिकेच्या दाव्याला मंजुरी दिली आहे आणि असा निर्णय दिला आहे की डीपीसी हे बिगर टॅरिफ उत्पन्न म्हणून विचारात घेतले जाणार नाही.

८. सन्माननीय एमईआरसीयांनी याचिकाकर्त्यांनी वित्तिय वर्ष २०१५-१६ आणि वित्तिय वर्ष २०१६-१७ साठी एकंदर महसूली आवश्यकता (एआरआर) ड्रुइंग-अप करणे, वित्तिय वर्ष २०१७-१८ च्या एआरआरचे तात्पुरते ड्रुइंग-अप आणि वित्तिय वर्ष २०१८-१९ ते वित्तिय वर्ष २०१९-२० चे सुधारीत अंदाज यांचे मध्यावधी कामगिरी पुनरावलोकन करण्याबाबत दाखल केलेल्या याचिकेला केस क्र. १७० सन २०१७ द्वारे दिनांकित १२-०९-२०१८ च्या अदेशानुसार मंजुरी दिली आहे.

९. सन्माननीय आयोगाने केस क्र. १७० सन २०१७ बाबत आदेश दिनांकित १२-०९-२०१८ मंजूर करतांना परवानगी नाकारण्याला आव्हान देण्यासाठी सदर याचिकाकर्त्यांनी सन्माननीय एपीटीईएल यांच्याशी संपर्क साधला आहे.

ए. तारीख ०१-०४-२०१५ तारखेच्या अतिरिक्त स्पेअर्स भागांच्या भांडवल निर्मिती करण्यासाठी निर्माण झालेल्या रु.४.३५ कोटीच्या अतिरिक्त भांडवली खर्चाला मंजुरी न देणे, कारण ते भांडवल निर्मितीच्या २ वर्षाच्या निर्णायक तारखेनंतर करण्यात आलेले होते.

बी. परवानगी असणारा आदर्श कामकाज व देखभाल खर्च, अधिक आदर्श खर्चा पेक्षा जास्त झालेल्या अतिरिक्त प्रत्यक्ष खर्चाच्या १/३ रक्कम. तथापि, याद्वारे आमच्या प्रत्यक्ष कामकाज व देखभाल खर्चाला परवानगी मिळत नाही.

सी. वर्ष २०१५-१६ साठी डीपीसी हे बिगर टॅरिफ उत्पन्न म्हणून विचारात घेतले जाणे.

डी. खेळत्या भांडवलाला अंतर्गत जमा झालेल्या रकमांमधून (इंटर्नल ॲक्रुअल्स) निधी पुरवठा झाल्याने खेळत्या भांडवलावरील आदर्श व्याज हे क्षमतेमधील वाढ समजण्यात आलेले आहे आणि खेळत्या भांडवलाच्या आवश्यकतेसाठी लक्षात येण्यासारखे कर्ज उपलब्ध केलेले नाही.

ई. नियमावलीच्या अनुसार आकस्मिक राखीवसाठी गुंतवणूक करण्यात आलेली नसल्यामुळे वर्ष २०१५-१६ आणि २०१६-१७ साठी आकस्मिक राखीवसाठी योगदान करण्यास परवानगी नव्हती.

एफ. दीर्घकालिक कर्जांवर प्रत्यक्षातील व्याजदर लावण्यास परवानगी नव्हती. तथापि, त्याचवेळेस वित्तिय संस्थांकडून आयसीडी कर्जांव्यतिरीक्त इतर दीर्घकालिक कर्जांसाठी दीर्घकालिक कर्जांवरील प्रत्यक्ष व्याजदर लावण्यास परवानगी होती.

याचिकाकर्त्यांने सन्माननीय एपीटीईएल यांच्याकडे दाखल केलेले अपील हे अपील क्र. ४०२ सन २०१८ म्हणून नोंदविण्यात आले आहे.

१०. याचिकाकर्ता हे सदर याचिका अपील क्र. ४०२ सन २०१८ मधील आपले अधिकार आणि मतभेदाचे मुद्दे यांच्यावर कोणतीही बाधा न येऊ देता दाखल करीत आहे.

११. ही याचिका दाखल करण्याच्या तारखेस एटीआयएल (तिरोडा-वरोरा) यांच्याविरूद्ध येथे नमूद केल्या व्यतिरिक्त इतर कोणतेही खटले शिल्लक नाहीत.

## १.२ वैधानिक तरतुदी

१२. याचिकाकर्ता हे पारेषण परवानाधारक असल्याने निर्देशित कायद्याच्या चौकटीमध्ये कामकाज करण्याची प्रयत्न करतात. पारेषण व्यवसाय हा पुढील कायदा, धोरणे आणि नियमावली यांच्या अंतर्गत चालविला जातो आणि नियमन केला जातो:

- विद्युत कायदा २००३;
- राष्ट्रीय विद्युत धोरण;
- राष्ट्रीय टॅरिफ पॉलिसी; आणि
- एमईआरसी (मल्टि इयर टॅरिफ) रेग्युलेशन्स, २०१५ आणि २०१९

१३. सन्माननीय आयोगाने ०१-०८-२०१९ रोजी उर्जानिर्मिती, पारेषण आणि वितरण यांचे टॅरिफ निश्चित करण्यासाठी एमवायटी रेग्युलेशन्स, २०१९ सूचित केले आहे. रेग्युलेशन ५ (१) (ए) हे पारेषण परवानाधारकांकडून ०१-११-२०१९ पर्यंत दाखल करावयाची मल्टि इयर टॅरिफ याचिका ("एमवायटी") वर्णन करीत आहे, ज्यामध्ये अंतर्भूत आहेत:

ए) महाराष्ट्र विद्‌युत नियामक आयोग (मल्टि इयर टॅरिफ) रेग्युलेशन्स, २०१५ अंतर्गत करण्यात यावयाचे वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि २०१८-१९ चे ड्रुइंग-अप;

बी) महाराष्ट्र विद्‌युत नियामक आयोग (मल्टि इयर टॅरिफ) रेग्युलेशन्स, २०१५ अंतर्गत करण्यात यावयाचे वित्तिय वर्ष २०१९-२० चे तात्पुरते ड्रुइंग-अप;

सी) एमईआरसी एमवायटी रेग्युलेशन्स, २०१९ अंतर्गत नियंत्रण कालावधी २०२०-२५ च्या प्रत्येक वर्षासाठी एकंदर महसूली आवश्यकता;

वरील गोष्टी विचारात घेता, एटीआयएल पुढील गोष्टी नमूद करीत आहे

ए) एमवायटी रेग्युलेशन्स, २०१५ च्या तरतुदींनुसार वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि २०१८-१९ साठी एआरआरच्या ड्रु-अपसाठी याचिका.

बी) एमवायटी रेग्युलेशन्स, २०१५ च्या तरतुदींनुसार वित्तिय वर्ष २०१९-२० च्या एआरआरच्या तात्पुरत्या ड्रु-अपसाठी याचिका.

सी) एमवायटी रेग्युलेशन्स, २०१९ च्या तरतुदींनुसार वित्तिय वर्ष २०२०-२०२१ ते २०२४-२५ या वर्षांच्या एआरआरची निश्चिती.

डी) केस क्र. ७ सन २०१६ वरील सन्माननीय एमईआरसीच्या आदेश दिनांकीत २८-०६-२०१६ विरुद्ध याचिकाकर्त्यांनी दाखल केलेल्या अपील क्र. २५० सन २०१६ बाबत सन्माननीय एपीटीईएल यांनी २९-०५-२०१९ च्या आदेशाद्‌वारे विरुद्ध निर्णय दिला आहे. सन्माननीय एपीटीईएल यांनी सन्माननीय आयोगाला टॅरिफच्या सुधारणेसाठी पुढील आदेश देण्याच्या सूचना दिल्या आहेत. याचिकाकर्त्यांनी आपल्या दिनांकीत ०४-०६-२०१९ च्या पत्राद्‌वारे सन्माननीय आयोगाला टॅरिफमध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील आदेश देण्याची विनंती केली आहे. याचिकाकर्त्यांनी सन्माननीय एपीटीईएलच्या आदेश दिनांकीत २९-०५-२०१९ ची अंमलबजावणी करण्यासाठी टॅरिफमध्ये सुधारणा करण्याविषयी आकडेमोड सादर केली आहे.

## १.३ अपील क्र. २५० सन २०१६ मधील सन्माननीय एपीटीईएल यांच्या दिनांकीत २९-०५-२०१९ च्या आदेशाचा प्रभाव.

१४. सन्माननीय एपीटीईएल यांनी याचिकाकर्ते यांनी दाखल केलेल्या अपील क्र. २५० सन २०१६ वर आपल्या आदेश दिनांकीत २९-०५-२०१९ द्वारे निर्णय दिलेला आहे. सन्माननीय एपीटीईएल यांनी सन्माननीय आयोगाला खालील प्रमाणे निर्देश दिला आहे

> *आम्ही प्रतिवादी आयोगाला (एमईआरसी) आमच्या या सोबत नमूद करण्यात येणाऱ्या पहाणीच्या अनुसार टॅरिफमधील सुधारणेसाठी परिणामस्वरुप ठरणारे आदेश देण्यासाठी निर्देश देत आहोत.*

१५. एपीटीईएल यांनी आपल्या आदेशामध्ये खालील प्रमाणे निर्णय दिला आहे

> *५.११ वरील बाबी विचारात घेता, आमचे असे मत आहे की प्रतिवादी आयोगाचा याचिकाकर्त्यांना भांडवली खर्च व त्या अनुषंगाने निर्माण होणारे टॅरिफ नाकारण्याचा निर्णय न्याय्य नाही. ........* ***बस रिॲक्टर्स बसविण्यासाठी परवानाधारकांनी केलेला प्रत्यक्ष खर्च विचाराता घेतला पाहिजे आणि वहनखर्चाचा समावेश असणारा संबंधित टॅरिफ लागू करण्यास परवानगी देण्यात आली पाहिजे.***
>
> *६.१७ वरील बाबी विचारात घेता, डीपीसीला बिगर टॅरिफ उत्पन्न समजणे चुकीचे आहे. याशिवाय अशा परिस्थितीमध्ये, समतेचे तत्व टिकवून राहण्यासाठी उत्तम मार्ग म्हणजे डीपीसीला बिगर टॅरिफ उत्पन्न न समजणे हा असेल.* ***त्यानुसार, आम्ही निर्णय देत आहोत की डीपीसी हे बिगर टॅरिफ उत्पन्न समजण्यात येऊ नये. (त्याबाबत विशेष जोर देण्यात येत आहे.)***

१६. यापुढे याचिकाकर्त्याने आपल्या दिनांकीत ०४-०६-२०१९ तारखेच्या पत्राद्वारे, सन्माननीय आयोगाला टॅरिफमध्ये लवकरात लवकर सुधारणा करण्याबाबत योग्य ते आदेश मंजूर करण्याची विनंती केली होती. ज्याअर्थी, सन्माननीय आयोगाने त्यापुढे कोणतेही नंतरचे आदेश मंजुर केलेले नसल्यामुळे, याचिकाकर्ता याद्वारे याठिकाणी वर नमूद केलेल्या सन्माननीय एपीटीईएल यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत टॅरिफमध्ये परिणामस्वरुप सुधारणा करण्यासाठी दावा करीत आहे. ज्याअर्थी २०१६-१७ पर्यंतचे टॅरिफ आधीच ट्रुड-अप करण्यात आलेले आहे, त्याअर्थी याचिकाकर्त्याने २०१२-१३ ते २०१६-१७ या प्रत्येक वर्षासाठी अतिरिक्त घटकनिहाय टॅरिफचा हिशेब केलेला आहे. हे अतिरिक्त घटकनिहाय (एलिमेन्टवाइज) टॅरिफ मंजुर झालेल्या ट्रुड-अप टॅरिफबरोबर सुधारीत परवानगी असणाऱ्या टॅरिफची तुलना करून हिशेब करण्यात आलेले आहे. याचिकाकर्त्याने याशिवाय

३१-०३-२०२० पर्यंत प्रत्येक वर्षाच्या वहन खर्चाचा देखील हिशेब केलेला आहे. याचिकाकर्ता यासोबत सन्माननीय एपीटीईएल यांचा निकाल विचारात घेऊन वहन खर्चाच्या समावेशासह टॅरिफमधील फरकाचे वर्षानुसार कोष्टक सादर करीत आहे.

**कोष्टक १.१: अपील क्र. २५० सन २०१६ मध्ये सन्माननीय एपीटीईएल यांनी दिलेल्या २९-०५-२०१९ तारखेच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी टॅरिफमधील वर्षनिहाय फेरफार**

(रु.कोटी)

| वहनखर्चाचा हिशेब | निकालाचा परिणाम | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुद्दलाची रक्कम/ व्याजदर | | १४.७५% | १४.७५% | १४.२९% | १०.७९% | १०.१९% | १०.१९% | ९.८९% | ९.९६% | |
| **बस रिॲक्टरचा प्रभाव** | | | | | | | | | | |
| २०१२-१३ | ४.४४ | | ०.६५ | ०.६३ | ०.४८ | ०.४५ | ०.४५ | ०.४४ | ०.४४ | ७.९९ |
| २०१३-१४ | ६.५१ | | | ०.९३ | ०.७० | ०.६६ | ०.६६ | ०.६४ | ०.६५ | १०.७७ |
| २०१४-१५ | ६.५४ | | | | ०.७१ | ०.६७ | ०.६७ | ०.६५ | ०.६५ | ९.८८ |
| २०१५-१६ | ८.२२ | | | | | ०.८४ | ०.८४ | ०.८१ | ०.८२ | ११.५३ |
| २०१६-१७ | ८.८३ | | | | | | ०.९० | ०.८७ | ०.८८ | ११.४८ |
| एकूण | ३४.५४ | ०.०० | ०.६५ | १.५६ | १.८९ | २.६२ | ३.५२ | ३.४२ | ३.४४ | ५१.६५ |
| **डीपीसीचा प्रभाव** | | | | | | | | | | |
| २०१५-१६ | २१.८५ | | | | | २.२३ | २.२३ | २.१६ | २.१८ | ३०.६४ |
| एकूण | २१.८५ | | | | | २.२३ | २.२३ | २.१६ | २.१८ | ३०.६४ |
| | | | | | | | | | | |
| एकूण प्रभाव | ५६.३९ | - | ०.६५ | १.५६ | १.८९ | ४.८५ | ५.७५ | ५.५८ | ५.६२ | ८२.२९ |

## १.४ वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि वित्तिय वर्ष २०१८-१९ यांच्यासाठी एआरआरचे ट्रु-अप

१७. वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि वित्तिय वर्ष २०१८-१९ च्या केस क्र. १७० सन २०१९ मध्ये एमटीपीआरच्या आदेशानुसार हे सन्माननीय आयुक्तानी दिलेल्या दिनांकीत १२-०९-२०१८ च्या मंजुरी अनुसार असणारी याचिकाकर्त्याची प्रत्यक्ष कामगिरी ही एआरआरच्या ट्रु-अप द्वारे स्पष्ट होत आहे.

१८. मंजुर झालेला एआरआर तसेच प्रत्यक्षातील एआरआर यांच्यामधील तुलना खालील कोष्टकामध्ये दिलेली आहे. याबाबतीत करण्यात आलेला याचिकाकर्त्याचा दावा हा सन्माननीय एपीटीईएल यांच्याकडे दाखल करण्यात आलेल्या अपील क्र. ४०२ सन २०१८ चा निकाल आणि त्यांचे अधिकार यांच्या पूर्वग्रहाशिवाय म्हणून समजण्यात आलेला आहे.

**कोष्टक १.२: वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि वित्तिय वर्ष २०१८-१९ साठी प्रत्यक्षात मंजुर झालेल्या एआरआर बरोबर तुलना**

**(रु.कोटी)**

| अनु. क्र. | तपशील | वित्तिय वर्ष २०१७-१८ | | वित्तिय वर्ष २०१८-१९ | |
|---|---|---|---|---|---|
| | | एमटीपीआर मंजूर | (प्रत्यक्ष) | एमटीपीआर मंजूर | (प्रत्यक्ष) |
| १ | कार्यान्वयन व देखभाल खर्च | ६.०६ | ९.६४ | ६.३५ | ११.९२ |
| २ | घसाऱ्यापोटी | ३६.१५ | ३७.३७ | ३६.२७ | ३७.५० |
| ३ | दीर्घकालिक कर्जावरील व्याज | ३५.९९ | ४०.४१ | ३१.७६ | ३५.६७ |
| ४ | खेळते भांडवल यावरील व्याज | २.४७ | २.५१ | २.०७ | २.४० |
| ५ | आयकर खर्च | ८.६४ | ७.५६ | ८.७२ | ६.०१ |
| ६ | आकस्मिक राखीवसाठी योगदान | १.७१ | ३.५४ | १.७१ | ३.५४ |
| ७ | **एकूण महसूली खर्च** | **९१.००** | **१०१.०३** | **८६.८८** | **९७.०४** |
| ८ | समभाग भांडवलावरील परतावा | ३१.८३ | ३२.९१ | ३२.१५ | ३३.०३ |
| ९ | **एकंदर महसूली आवश्यकता** | **१२२.८४** | **१३३.९४** | **११९.०३** | **१३०.०६** |
| १० | वजा: बिगर टॅरिफ उत्पन्न | ०.३१ | | ०.३७ | ०.६४ |
| ११ | वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न | | | | |
| १२ | वजा: ओपन ॲक्सेस चार्जेसपासून उत्पन्न | | | | |
| १३ | **निव्वळ एकंदरीत महसूली आवश्यकता** | **१२२.५३** | **१३३.९४** | **११८.६५** | **१२९.४२** |

१९. एआरआरच्या वरील निकषांबोबरच याचिकाकर्त्याने मंजूर झालेल्या एआरएआरच्या तुलनेत ह्या याचिकेमध्ये दावा केलेल्या एआरआरच्या फरक/वृद्धीसाठी ३१-०३-२०२० पर्यंतच्या पुढे नेलेल्या खर्चाचा हिशोब केलेला आहे.

२०. वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि वित्तिय वर्ष २०१८-१९ साठी प्रत्यक्ष उपलब्धता अनुक्रमे ९९.८३% आणि ९९.९२% असल्याचे विचारात घेता सदर याचिकाकर्ता वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि वित्तिय

वर्ष २०१८-१९ साठी अनुक्रमे १.०३ कोटी, आणि ०.९८ कोटी एवढ्या इन्सेन्टिव्हसाठी पात्र आहेत ही रक्कम एमवायटी रेग्युलेशन २०१५ अनुक्रमे यांच्या अंतर्गत निर्देशित केलेल्या इन्सेन्टिव्हसाठी सर्वसाधारणत: उपलब्धता असणाऱ्या अनुक्रमे ९९% या रकमेपेक्षा जास्त आहे.

२१. त्यामुळे वित्तिय वर्ष २०१७-१८ साठी (एआरआरचे कॅरींग कॉस्ट आणि इन्सेन्टिव्ह विचारात घेता) महसूली तफावतीचा रु.१६.७५ कोटी आणि वित्तिय वर्ष २०१८-१९ साठी (एआरआरचे कॅरींग कॉस्ट आणि इन्सेन्टिव्ह विचारात घेता) रु.२०.४६ कोटी एवढी होती;

२२. महसूलामधील फरकाचा हिशेब करणारे कोष्टक खाली देण्यात येत आहे; याशिवाय हे कोष्टक एमवायटी रेग्युलेशन्सनुसार होणारा महसूली तफावतीचा हिशेब देखील दाखवते.

**कोष्टक १.३: ट्रु-अप सारांश**

**(रु.कोटी)**

| अनु. क्र. | तपशील | फॉर्म्यूला | वित्तिय वर्ष २०१७-१८चे प्रत्यक्ष आकडे | वित्तिय वर्ष २०१८-१९चे प्रत्यक्ष आकडे |
|---|---|---|---|---|
| १ | एमवायटी आदेशामध्ये मंजूर एआरआर | ए | १२२.५३ | ११८.६५ |
| २ | ग्राहकाकडे मार्गस्थ करण्यात यावयाच्या नियंत्रणाबाहेरील घटकामुळे नफा (तोटा) | बी | ११.४० | १०.५८ |
| ३ | ग्राहकाकडे ढकलण्यात यावयाच्या नियंत्रणातील घटकांमुळे १/३ नफा (तोटा) | सी | ०.५८ | ०.०६ |
| **४** | **ट्रुड-अप एआरआर** | **डी = ए+बी+सी** | **१३४.५१** | **१२९.२९** |
| ५ | इन्सेन्टिव्हची उपलब्धता | ई | १.०१ | ०.९९ |
| ६ | वित्तिय वर्ष २०१७-१८ मध्ये एआरआरच्या वसुलीमध्ये झालेल्या विलंबाबद्दल कॅरींग कॉस्ट | एफ | २.६६ | |
| ८ | वित्तिय वर्ष २०१७-१८ इन्सेन्टिव्हच्या वसुलीमध्ये झालेल्या विलंबाबद्दल कॅरींग कॉस्ट | जी | ०.१८ | |
| ९ | वित्तिय वर्ष २०१८-१९ मध्ये एआरआरच्या वसुलीमध्ये झालेल्या विलंबाबद्दल कॅरींग कॉस्ट | एच | | १.६८ |

| अनु. क्र. | तपशील | फॉर्म्यूला | वित्तिय वर्ष २०१७-१८चे प्रत्यक्ष आकडे | वित्तिय वर्ष २०१८-१९चे प्रत्यक्ष आकडे |
|---|---|---|---|---|
| १० | वित्तिय वर्ष २०१८-१९ इन्सेन्टिव्हच्या वसुलीमध्ये झालेल्या विलंबाबद्दल कॅरींग कॉस्ट | आय | | ०.१० |
| ११ | संपूर्ण वर्षात टीएसयू कडून वसुल केलेला एकंदर महसूल | जे | १२३.४४ | ११३.५० |
| | | | | |
| १४ | **महसूली तफावत / (फायदा)** | **के=डी+ई+एफ+जी+एच+आय+जे** | **१४.९१** | **१८.५५** |

२३. याचिकाकर्ता सन्माननीय आयोगाला एटीआयएलचे सादर करण्यात आलेले कामगिरीचे वास्तविक आकडे मंजूर करण्याची विंनती करीत आहेत.

वर्तमान स्थितीमध्ये वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि वित्तिय वर्ष २०१८-१९ च्या एआरआरची अद्याप अंतिम जुळवणी (ट्रु-अप) करावयाची असल्यामुळे ह्या याचिकेचा निकाल लागून अंतिम आयएनएसटीएस आदेश प्रसिद्ध होईपर्यंत आणि त्यामुळे फरकाच्या वसुलीची कार्यवाही सुरु होईपर्यंत असणाऱ्या काळासाठी याचिकाकर्ता हा वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि वित्तिय वर्ष २०१८-१९ च्या एआरआरच्या वसुलीसाठी होणाऱ्या विलंबामुळे निर्माण होणाऱ्या वहन खर्चाचा लाभ मिळण्यास पात्र आहेत. तथापि या याचिकेमध्ये ३१-०३-२०२० पर्यंत वहन खर्चाचा हिशेब करण्यात आलेला आहे. याचिकाकर्ता याचिकाकर्त्याकडून दाखल करण्यात येणाऱ्या दुसऱ्या याचिकेमधून वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि वित्तिय वर्ष २०१८-१९ यांच्या वसुलीमधील कथित विलंबासाठी ०१-०४-२०२० पासून लागू होणाऱ्या अतिरिक्त वहन खर्चाचा दावा करण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे.

## १.५ वित्तिय वर्ष २०१९-२० च्या एआरआरचे तात्पुरते ट्रू-अप

२४. वित्तिय वर्ष २०१९-२० साठी एटीआयएलने दुसऱ्या अर्धवर्षातील अलेखापरिक्षित अर्धवार्षिक लेखा आणि अंदाज यांच्या आधारे पहिल्या अर्धवर्षातील प्रत्यक्ष कामगिरीची तुलना दुसऱ्या अर्धवर्षाच्या एमवायटी आदेशामध्ये मंजूर झालेल्या एआरआर बरोबर केलेली आहे. वित्तिय वर्ष २०१९-२० च्या मंजूर केलेल्या व सुधारीत एआरआर यांची तुलना पुढील कोष्टकामध्ये करण्यात आली आहे.

**कोष्टक क्र. १.४: वित्तिय वर्ष २०१९-२० च्या मंजूर झालेल्या व अंदाजे एआरआरची तुलना**

(रु.कोटी)

| तपशील | मंजूर एमटीपीआर | अंदाजे |
|---|---|---|
| कार्यान्वयन व देखभाल खर्च | ६.६५ | १२.३० |
| घसाऱ्यापोटी खर्च | ३६.३८ | ३७.६४ |
| दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | २७.५२ | ३०.४९ |
| खेळते भांडवल आणि ग्राहकांचे सिक्युरीटी डिपॉझिट यावरील व्याज | २.०६ | २.४१ |
| आयकर | ८.६९ | ८.९९ |
| आकस्मिक राखीवसाठी योगदान | १.७२ | ३.५६ |
| **एकूण महसूली खर्च** | **८३.०३** | **९५.३९** |
| समभाग भांडवलावरील परतावा | ३२.०४ | ३३.१५ |
| **एकंदर महसूली आवश्यकता** | **११५.०८** | **१२८.५४** |
| वजा: बिगर टॅरिफ उत्पन्न | ०.४९ | |
| वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न | | |
| वजा: ओपन ॲक्सेस चार्जेसपासून उत्पन्न | | |
| **पारेषण टॅरिफपासून एकंदर महसूली आवश्यकता** | **११४.५८** | **१२८.५४** |

२५. याचिकाकर्त्याने सध्या वित्तिय वर्ष २०१८-१९ साठी कोणत्याही इन्सेन्टिव्ह व वहन खर्च यांचा दावा केलेला नाही. संबंधित वर्षाच्या अंतिम जुळवणीच्या (ट्रु-अप) वेळेस वित्तिय वर्ष २०१९-२० च्या इन्सेन्टिव्ह आणि वहन खर्च यांच्यासाठी दावा करण्यात येईल.

## १.६ वित्तिय वर्ष २०२०-२१ आणि २०२४-२५ साठी टॅरिफचा अंदाज

२६. एमवायटी रेग्युलेशन्स २०१९ मध्ये नमूद केलेल्या मूलभूत तत्वांच्या आधारे याचिकाकर्त्याने चौथा नियंत्रण कालावधीमधील वित्तिय वर्ष २०२०-२१ आणि वित्तिय वर्ष २०२४-२५ या पाच वर्षांसाठी एआरआर प्रक्षेपित केलेला आहे. खालील कोष्टकामध्ये सन्माननीय आयोगाने एकंदरीत महसूली आवश्यकतांच्या विविध शीर्षाखाली मंजूर केलेल्या एमवायटी बरोबर एआरआरच्या सुधारीत अंदाजांचा सारांश दिलेला आहे.

### कोष्टक १.५: वित्तिय वर्ष २०२०-२१ आणि वित्तिय वर्ष २०२४-२५ साठी एआरआरचा अंदाज

(रु.कोटी)

| तपशील | वित्तिय वर्ष २०२०-२१ | वित्तिय वर्ष २०२१-२२ | वित्तिय वर्ष २०२२-२३ | वित्तिय वर्ष २०२३-२४ | वित्तिय वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|
| | प्रक्षेपण | प्रक्षेपण | प्रक्षेपण | प्रक्षेपण | प्रक्षेपण |
| | (l) | (m) | (n) | (o) | (p) |
| कार्यान्वयन व देखभाल खर्च | १२.२७ | १२.७८ | १३.२६ | १३.७४ | १४.२९ |
| घसाऱ्यापोटी खर्च | ३७.६६ | ३७.६६ | ३७.६६ | ३७.६६ | ३७.६६ |
| भांडवली कर्जावरील व्याज | २५.५४ | २०.५५ | १५.६६ | १०.५७ | ५.५८ |
| खेळते भांडवल आणि ग्राहकांचे सिक्युरीटी डिपॉझिट यावरील व्याज | २.३० | २.२५ | २.१९ | २.१४ | २.०९ |
| आयकर | | | | | |
| आकस्मिक राखीवसाठी योगदान | ३.५७ | ३.५७ | ३.५७ | ३.५७ | ३.५७ |
| **एकूण महसूली खर्च** | **८१.३४** | **७६.८०** | **७२.२३** | **६७.६८** | **६३.१८** |
| अधिक: समभाग भांडवलावरील परतावा | ३८.१८ | ३८.१८ | ३८.१८ | ३८.१८ | ३८.१८ |
| **एकंदर महसूली आवश्यकता** | **११९.५२** | **११४.९८** | **११०.४२** | **१०५.८६** | **१०१.३७** |
| वजा: बिगर टॅरिफ उत्पन्न | ० | ० | ० | ० | ० |
| वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न | | | | | |
| वजा: ओपन ॲक्सेस चार्जेसपासून उत्पन्न | | | | | |
| **पारेषणाकडून एकंदर महसूली आवश्यकता** | **११९.५२** | **११४.९८** | **११०.४२** | **१०५.८६** | **१०१.३७** |

## १.७ मागील कालावधीची प्रस्तावित वसुली आणि तिचा एआरआरवर होणारा परिणाम

२७. याचिकाकर्ता मागील कालावधीमधील (वित्तिय वर्ष १५-१६, वित्तिय वर्ष १६-१७ आणि वित्तिय वर्ष १७-१८) फरक/(फायदा) याच्या परिणामाची वसुली वित्तिय वर्ष २०१८-१९ मध्ये करण्याचा विचार करीत आहे. त्यानुसार खाली दिलेल्या कोष्टकामध्ये संचित एआरआरचा (स्वतंत्र एआरआर अधिक मागच्या कालावधीमधील महसूली तफावत) दावा दाखविण्यात आलेला आहे:

## कोष्टक १.६: वित्तिय वर्ष २०२०-२१ च्या एआरआर आवश्यकतांवर मागच्या कालावधीमधील वसुलीचा परिणाम

(रु.कोटी)

| तपशील | | वित्तिय वर्ष २०२०-२१ | वित्तिय वर्ष २०२१-२२ |
|---|---|---|---|
| सदर वर्षासाठी स्वतंत्र एआरआर | ए | ११९.५२ | ११४.९८ |
| महसूली तफावत / (फायदा) - वित्तिय वर्ष २०१७-१८ | बी=सी+डी+ई+एफ | १४.९१ | - |
| इन्सेन्टिव्हची उपलब्धता | सी | १.०१ | - |
| महसूली तफावत / (फायदा) | डी | ११.०७ | - |
| वित्तिय वर्ष २०१७-१८ मध्ये एआरआरच्या वसुलीमध्ये झालेल्या विलंबाबद्दल कॅरींग कॉस्ट | ई | २.६६ | - |
| वित्तिय वर्ष २०१७-१८ इन्सेन्टिव्हच्या वसुलीमध्ये झालेल्या विलंबाबद्दल कॅरींग कॉस्ट | एफ | ०.१८ | - |
| महसूली तफावत / (फायदा) - वित्तिय वर्ष २०१८-१९ | जी=एच+आय+जे+के+एल | १८.५५ | - |
| इन्सेन्टिव्हची उपलब्धता | एच | ०.९९ | - |
| महसूली तफावत / (फायदा) | आय | १०.६४ | - |
| वित्तिय वर्ष २०१८-१९ साठी वसूल करावयाच्या वसूलीमधील कमतरता | जे | ५.१५ | |
| वित्तिय वर्ष २०१८-१९ मध्ये ट्रु-अप एआरआरच्या वसुलीमध्ये झालेल्या विलंबाबद्दल कॅरींग कॉस्ट | के | १.६८ | - |
| वित्तिय वर्ष २०१८-१९ इन्सेन्टिव्हच्या वसुलीमध्ये झालेल्या विलंबाबद्दल कॅरींग कॉस्ट | एल | ०.१० | - |
| महसूली तफावत / (फायदा) - वित्तिय वर्ष २०१९-२० | एम | १३.९८ | - |
| | | | |
| महसूली तफावत - एपीटीईएल निकाल | एन=ओ+पी+क्यू | १००.०१ | |
| महसूली तफावत - बस रिॲक्टर - एपीटीईएल निकाल | ओ | ३४.५४ | |
| कॅरींग कॉस्ट - बस रिॲक्टर - एपीटीईएल निकाल | पी | १७.१० | |

| तपशील | | वित्तिय वर्ष २०२०-२१ | वित्तिय वर्ष २०२१-२२ |
|---|---|---|---|
| महसूली तफावत - डीपीसी - एपीटीईएल निकाल | क्यू | २१.८५ | |
| कॅरींग कॉस्ट - डीपीसी - एपीटीईएल निकाल | आर | ८.७९ | |
| अतिरिक्त आयकर दायित्व - एपीटीईएल निकाल | एस=(ओ+पी+क्यू+आर) *२१.५४% | १७.७२ | |
| | | | |
| **महसूली तफावत / (फायदा) -** | **टी=बी+जी+एम+एन** | १४७.४५ | - |
| **संचित एआरआर वसुली** | **यू=ए+टी** | २६६.९७ | ११४.९८ |

## १.८ प्रार्थना

२८. वरील गोष्टी विचारात घेता याचिकाकर्ता सन्माननीय आयोगाला पुढील गोष्टी करण्यासाठी विनम्रपणे विनंती करीत आहे:

ए) वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि वित्तिय वर्ष २०१८-१९ च्या एआरआरचे ट्रु-अप, वित्तिय वर्ष २०१९-२० च्या एआरआरचे तात्पुरते ट्रु-अप आणि वित्तिय खर्च २०२०-२१ वित्तिय खर्च २०२४-२५ साठी वार्षिक महसूल आवश्यकता यांच्यासाठी करण्यात येणारी वर्तमान याचिका दाखल करून घेण्यात यावी.

बी) अपील क्र. २५० सन २०१६ वरील सन्माननीय एपीटीईएल यांच्या २९-०५-२०१९ तारखेच्या आदेशाची इन्सेन्टिव्हस आणि वहन खर्च यांच्या सुधारणेमधील उपलब्धतेच्या अनुषंगाने होणारी टॅरिफमधील सुधारणा अंमलात आणण्यासाठी परवानगी देण्यात यावी.

सी) या याचिकेमध्ये दावा केल्यानुसार कार्यान्वयन व देखभाल खर्चासाठी परवानगी देणे.

डी) लेखापरिक्षित लेखांच्या आधारे वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि वित्तिय वर्ष २०१८-१९ साठी एआरआरच्या ट्रु-अपला परवानगी देणे आणि या याचिकेमध्ये सादर केलेल्या या वर्षाच्या महसूली तफावतीला वहन करण्यात येणारे खर्च व इन्सेन्टिव्हज यांच्यासह मंजुरी देणे.

ई) ३०-०९-२०१९ पर्यंतच्या अलेखापरिक्षित लेखांच्या आधारे वित्तिय वर्ष २०१९-२० साठी एआरआरच्या तात्पुरत्या ट्रु-अपला परवानगी देणे.

एफ) एटीआयएलने या याचिकेमध्ये प्रस्तावित केल्यानुसार वित्तिय वर्ष २०२०-२१ आणि २०२४-२५ साठी एआरआरला परवानगी देणे.

जी) वहनखर्च आणि इन्सेन्टिव्ह यांचा समावेश असणाऱ्या संचित महसूली तफावतीला परवानगी देणे आणि नवीन आंतरराज्य पारेषण प्रणाली टॅरिफ ऑर्डर किंवा वर्तमान आंतरराज्य पारेषण प्रणाली टॅरिफ ऑर्डर मधील दुरुस्ती यांच्याद्वारे त्यांची वसुली करण्यास परवानगी देणे.

एच) भविष्यकाळातील कोणत्याही तारखेस, गरज पडल्यास, याचिकाकर्त्याला याचिकेमध्ये वाढ/फेरफार/बदल/दुरुस्ती करण्यासाठी परवानगी देणे.

आय) चुकून एखादी गोष्ट वगळली गेलेली असल्यास/चुकल्यास/त्रुटी असल्यास माफ करणे आणि एमटीआयला या सादरीकरणामध्ये वाढ/बदल/दुरुस्ती/फेरफार करण्यास तसेच पुढच्या एखाद्या तारखेस गरज पडेल त्यानुसार आणखी निवेदन सादर करण्यास परवानगी देणे.

जे) या संपूर्ण प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थिती लक्षात घेऊन सन्माननीय आयोगाला उचित व सुयोग्य असे पुढील आदेश जारी करणे.